# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३५०-२२** **दिनांक २३/११/२०२२**

## खुनाचे गुन्हयातील ०७ वर्षापासुन फरारी आरोपी यास उत्तरप्रदेश येथुन अटक

दिनांक ०९/०७/२०१६ रोजी ०७.०० वा चे पुर्वी (नक्की वेळ माहीती नाही) मिरा-भाईंदर महानगरपालीकेचे मल निस्सारन प्लांटचेजवळ पय्याडे हॉटेल ते लोढा रोडकडे जाणारे रोडचे कडेला फुटपाथवर, नयानगर, मिरारोड पुर्व येथे रईस रोशन अन्वर हुसेन यास संशईतांनी मारहाण करुन खून केला होता. यातील मयत इसम नामे रईस रोशन अन्वर हुसेन याचा व आरोपी नामे शानु कालीया ऊर्फ शाहनवाज आयज अहमद खान यांच्यात पुर्वीच्या झालेल्या भांडणाचा वाद होता. या गोष्टीचा मनात राग धरुन मयत यास कायमचा धडा शिकविण्यासाठी पाहिजे आरोपीत नं. १. शानु कालीया व त्याचे साथीदार यातील अटक आरोपी क्र २. सोहेल शेख, क्र ३. नौशाद ऊर्फ अली इर्शाद शेख व पाहीजे आरोपीत क्र ४. असद अहमद सिध्दीकी यांनी त्यास जिवे ठार मारले व पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मयताचे कपडे काढुन ते फेकुन दिले व मयताचा मोबाईल त्याचे सोसायटीचे गेटसमोर फुटपाथवर नेवुन टाकला होता. सदरबाबत नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. २२०/२०१६ भादंवीस ३०२, २०१, ४०४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा करणारा मुख्य आरोपी १) शानु कालीया ऊर्फ शाहनवाज आयज अहमद खान रा. रुम क्र. ४०४ तनविर अपार्टमेंट, दिपक हॉस्पीटलचे मागे मिरा-भाईंदर मिरारोड पुर्व हा गुन्हा केलेपासुन फरारी झाला होता. सदर आरोपीचा वरिष्ठ पोलीस अधिका-यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष-१ काशिमीरा यांचेकडून शोध चालु होता. पोलीस तपास पथक सफौ. संदीप शिंदे, पोहवा/पुष्पेंद्र थापा, पोहवा/सचिन सावंत, पोशि/प्रशांत विसपुते यांचे मार्फतीने अमेठी, उत्तरप्रदेश आरोपीचा शोध घेत असताना मुख्य आरोपी शानु कालीया ऊर्फ शाहनवाज हा बहबल का पूर्वा, माहोना पश्चिम येथे असण्याची शक्यता असल्याची माहिती मिळाल्याने सदर परिसरात जाऊन एसटीएफ लखनऊ यांचे मदतीने तपास चालू केला. तपासात तांत्रीक विश्लेषनाचे आधारे आरोपीची माहिती प्राप्त करुन आरोपी कमरोली, अमेठी उत्तरप्रदेश येथे येत असल्याची माहिती मिळताच एसटीएफ लखनऊ उत्तरप्रदेश यांचे मदतीने सदर परिसरात साफळा रचुन आरोपी यास दिनांक २३/११/२०२२ रोजी ताब्यात घेतले आहे.

सदरची कामगिरी मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.नि. श्री अविराज कुराडे, स.पो.नि.पुष्पराज सुर्वे, सफौ. राजु तांबे, सफौ. संदीप शिंदे, सफौ. किशोर वाडीले, सफौ. संजय पाटील, पोहवा/संजय शिंदे, पोहवा/संतोष लांडगे, पोहवा/पुष्पेंद्र थापा, पोहवा/विजय गायकवाड, पोहवा/प्रफुल्ल पाटील, पोहवा/विकास राजपूत, पोहवा/सचिन सावंत, पोहवा/समीर यादव, पोशि/प्रशांत विसपुते, पो.शि/सनी सुर्यवंशी यांनी केली आहे.